द्वितीय मुदतवाढ

तातडीचे

कालमर्यादित

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/ 10316

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे- ४११ ००१.

दिनांक : 17 DEC 2015

प्रति,

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.

**विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्थांना शासनमान्यता देणेकरिता मुदतवाढ देणेबाबत...... (दुसरा टप्पा)**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१, दि. ३१ ऑक्टोबर २०१३.

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.-७३/एसडी-२, दि. २८ ऑगस्ट २०१४.

३. शासन शुध्दीपत्र क्रमांक :- संकीर्ण-२०१५/प्र.क्र.-११६/एसडी-२, दि. ३०/०९/२०१५.

४. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४६५२, दि. १६/०६/२०१५.

५. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४७४९, दि. २०/०६/२०१५.

६. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४९०७, दि. २५/०६/२०१५.

७. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/९७२५, दि. २१/११/२०१५.

८. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/९९०५, दि. ०२/१२/२०१५.

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, राज्यातील शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता आवश्यक संगणक सेटअपची माहिती भरण्याकरिता संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर नमुना फॉर्म क्र. २ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरची लिंक अंतिम तारीख दि. २२/१२/२०१५ पर्यंत खुली राहील.

संस्थांमार्फत भरल्या जाणाऱ्या सदर संगणक सेटअपची माहिती व त्यानुसार अपलोड करण्यात आलेल्या कागदपत्रांची लिंक आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार संस्थांनी भरलेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याची खात्री करण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी सदर प्रस्ताव ३ प्रतीत स्विकारुन उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ५ नुसार तात्काळ छाननी व प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल व शिफारशीसह सदर प्रस्तावाच्या २ प्रती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावयाचे आहेत.

शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी आपल्या जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संख्येनुसार संस्थांची तपासणी करण्यासाठी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तसेच शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मदतीने करण्यासाठीचे नियोजन करावे. संस्था तपासणीकरीता त्या - त्या तालुक्याचे डाटा एंट्री ऑपरेटर किंवा संगणक तज्ञ यांच्यासह करण्यासाठी आपल्या स्तरावरुन त्यांना आदेश देण्यात यावे. सदर कामकाज कालमर्यादित असल्याने सर्वांची एकत्रित बैठक घेऊन त्यांना सविस्तर सूचना देण्यात याव्यात.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडुन प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची तात्काळ छाननी करुन व खात्री करुनच संगणक संस्थांच्या परिपुर्ण प्रस्तावांना जिल्हानिहाय कॅम्प घेऊन मान्यता देण्याची कार्यवाही करावी. सदरची कार्यवाही संदर्भ पत्र क्र. ५ च्या पत्रामध्ये (प्रत संलग्न) देण्यात आलेल्या निर्देशानुसार दि. ०५/०१/२०१६ पर्यंत पुर्ण करण्यात यावी.

संस्थांना दिलेल्या मान्यतेची एक प्रत शिक्षणाधिकारी (माध्य.) व संबंधित संस्थाचालक यांना देण्यात यावी. आपल्याकडे प्राप्त झालेल्या सर्व संस्थांच्या प्रस्तावांच्या दोन प्रतींपैकी प्रस्तावाची एक प्रत आपल्या स्पष्ट शिफारशीसह सांकेतांक क्रमांक देण्यासाठी एकत्रित स्वरुपात खास दुताकरवी दि. १२/०१/२०१६ पुर्वी या कार्यालयाकडे सादर करावेत.

(आर. व्ही. गोधने)

आयुक्त,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-** सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था, महाराष्ट्र व गोवा राज्य.

परिपत्रक
तातडीचे
कालमर्यादित

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/ 4749
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
दिनांक :- २०/०६/२०१५.

प्रति,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्थांना शासनमान्यता देणेबाबत...**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२)/साशि-१, दि. ३१ ऑक्टोबर २०१३.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.-७३/एसडी-२, दि. २८ ऑगस्ट २०१४.
३. परिषदेचे पत्र क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४६५२, दि. १६/०६/२०१५.

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार शासनाने राज्यातील टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता मान्यता दिलेली आहे.

मान्यता व संचालन नियम १९९१, सुधारित नियमावली-२०१४ मधील प्रकरण क्र. २, पृष्ठ क्र. २१ व २२ नुसार संगणक टायपिंग अभ्यासक्रमाकरिताचा सेटअप तयार असणाऱ्या संस्थांकडुन त्याबाबतची माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरण्याकरिता नमुना फॉर्म क्र. २ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

संस्थांमार्फत भरल्या जाणाऱ्या सदर संगणक सेटअपच्या माहितीची लिंक शिक्षणाधिकारी (माध्य.) व आपणास लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

संगणक संस्थांनी सदर ऑनलाईन फॉर्मची प्रत व मान्यता व संचालन नियम १९९१, सुधारित नियमावली २०१४ मध्ये दिलेल्या परिशिष्ट-अ-(सी-१) मध्ये माहिती भरुन व नियमावलीनुसार सर्व आवश्यक कागदपत्रांसह सादर केलेल्या प्रस्तावांची संबंधित शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी उपशिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या समवेत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नियुक्त केलेल्या डाटा ऐंट्री ऑपरेटर किंवा जिल्हास्तरावर कार्यरत असणाऱ्या संगणक कक्षाकडील तज्ञांच्या मदतीने संस्थेची तपासणी करून संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयातील निकषांची पुर्तता होत आहे का ? याची खात्री करुन सुधारित नियमावलीतील परिशिष्ट-अे-(सी-२) मध्ये वस्तुनिष्ठ तपासणी करुन प्रस्ताव शिफारशीसह विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करण्याकरिता आपण आपल्या स्तरावरुन आदेश द्यावेत.

शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची तात्काळ छाननी करून व खात्री करुनच संगणक संस्थेला मान्यता देण्याची कार्यवाही करावी व सांकेतांक क्रमांक देण्यासाठी मान्यता आदेशासह परिषदेकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधित संगणक संस्थांना सुचीत करण्यात यावे. सदरची कार्यवाही दि.२१ जून ते ३० जून या कालावधीत पुर्ण करणेत यावी.

सोबत :- १) परिशिष्ट-अे-(सी-१)
२) परिशिष्ट-अे-(सी-२)

(व्ही. बी. पायमल)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :- सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद महाराष्ट्र राज्य.

E:\s\New letter\ALL GCC CLERKS\Mokashi\LETTER.docx